**वाचले :-** १) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१०
२) मा. आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्रमांक स्थासंक/६/१४६/२०१४ दि.२७/१/२०१४

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८. लेखा विभाग.
क्र. लेखा/२३/कावि/८७७/२०१४
दिनांक :- १६/१२/२०१४

**परिपत्रक,**

**विषय :- म.न.पा. शहरा बाहेरुन आयात करित असलेल्या मालाचे स्थानिक संस्था कराबाबत (LBT)....**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे मध्यवर्ती भांडार, स्थापत्य, पाणीपुरवठा व जलनि:सारण, विदयुत, झोनिपु - स्थापत्य, उद्यान विभाग, वैद्यकीय विभाग (मध्यवर्ती भांडार कक्ष), तसेच क्षेत्रिय कार्यालयामार्फत भांडवली स्वरुपाची विकासकामे ठेकेदारांकडून करुन घेणेत येतात,तसेच निरनिराळया विभागामार्फत आवश्यकतेनुसार साहित्य,यंत्रसामुग्री सेवासुविधा इ. खरेदी केली जाते. अशा भांडवली व महसुली कामांची बिले मंजूर करुन अदायगीसाठी लेखाविभागाकडे पाठविली जातात. अशी बिले लेखाविभागाकडे पाठविताना संबंधित पुरवठाधारक/ठेकेदाराने वाचले क्र. २ नुसार दि. ०१/०४/२०१३ पासून LBT भरलेली आहे किंवा नाही? याबाबत संबंधित खात्याने शहानिशा करणे आवश्यक आहे.

त्यासाठी कर कपात करताना स्थानिक संस्था कर प्रणाली नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे साहित्य/यंत्रसामुग्री/सेवा पुरवठाधारक यांनी स्थानिक संस्था कर जमा करणे आवश्यक आहे. मनपाचे वेबसाईटवर सदर करदर, नियम याची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. त्याचे अवलोकन व्हावे. सदर प्रकरणी काही अडचण असलेस स्थानिक संस्था कर विभागाशी संपर्क साधून नियमांनुसार कार्यवाही करावी. मनपाचे उत्पन्न वाढविणेचा सदर भाग आहे. त्याकडे सर्व विभागप्रमुखांनी जाणीव पूर्वक लक्ष दयावे.

यास्तव महसुली/भांडवली खर्चाची बिले लेखा विभागाकडे सादर करताना LBT नियमांनुसार सदर कर संबंधीत पुरवठाधारक/ठेकेदार यांनी त्यांचे LBT खात्यावर जमा करुन त्याचे चलन बिलांसोबत जोडणे आवश्यक आहे, आणि तसा दाखला प्रत्येक बिलावरती सक्षम प्राधिकृत अधिका-याने साक्षांकित करुन दयावा. LBT जमा केले बाबतची पूर्तता केलेशिवाय कोणतेही बिल लेखा विभागाकडे पाठवू नये. अन्यथा स्थानिक संस्था कर कार्यालयामार्फत काही कारवाई झालेस संबंधीत विभागाचे शाखाप्रमुख/ विभागप्रमुख म्हणून आपण जबाबदार आहात. याची कृपया नोंद घ्यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

**प्रति :-** सर्व संबंधित विभागप्रमुख/ शाखाप्रमुख
यांना माहिती व कार्यवाही साठी.

२/ परिपत्रकासोबतचे प्रमाणपत्र प्रत्येक बिलासोबत जोडणेत यावे

# प्रमाणपत्र

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या --------------------------------------------- या विभागातील ------------------------------------------------------------------------------------------ ----------------------- या कामासाठी कोटेशन नोटीस / निविदा नोटीस -------------ई द्वारे निविदा /कोटेशन नोटीस क्र. -------------------------------दिनांक ------------------ अन्वये

मे----------------------------------------हे मनपा हद्दीमधील निविदा धारक/सेवा/सामग्री/ पुरवठाधारक आहेत. त्यांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानिक संस्था कर कार्यालयाकडील नोंदणी क्रमांक ------------------------ असा आहे. उपरोक्त नमूद कामासाठी मनपा हद्दीत आयात मालावरील LBT ची रक्कम चलन क्र. ------------------- दिनांक - / / अन्वये भरणा मनपाकडे केलेला आहे.

किंवा

मनपा हद्दीबाहेरील निविदा धारक/सेवा/सामग्री/पुरवठाधारक यांची उपरोक्त नमुद कामासाठी मनपाहद्दीत आयात मालावरील LBT ची रक्कम या बिलाद्वारे वसुल करणेत येत आहे.

**विभागप्रमुख**